Exh. 9/D

फौजदारी किरकोळ अर्ज नं. ६/२०२६

**मे. जिल्हा व सत्र न्यायाधिशसो, कोल्हापुर.**

यांचे कोर्टात

पोपट दुर्गे ... अर्जदार

Order
Seen & filed

ASHISH MANOHAR PATIL

Digitally signed by ASHISH MANOHAR PATIL
Date: 2026.07.24 17:19:18 +0530

विरुध्द

व्ही ९ रिसोर्ससेस वगैरे .... वि.प.

PDJ, Kolhapur
21-7-26

**यातील वि.प. नं. १,२ व ५ तर्फे अर्जदाराच्या अर्जास म्हणणे पुढील प्रमाणे, —**

१. अर्जातील बहुतांश मजकुर, कथने, कारणे पुर्णपणे खोटी, चुकीची व लबाडीची असुन वि.प यांना ती मान्य व कबुल नाहीत. वि.प. यांचा या अर्जास सक्त विरोध आहे.

२. अर्जदार स्वच्छ हाताने मे. कोर्टासमोर आलेला नाही. अर्जदाराचा अर्ज आहे त्या स्वरूपामध्ये चालणेस पात्र नाही. अर्जदार यांनी हा अर्ज प्रथम निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट चे कामा संदर्भातील मुख्य प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांचेकडे दाखल करणे आवश्यक होते त्या नंतरच या मे. कोर्टाकडे प्रस्तुत अर्जाची रचना करणे कायदेशीर झाले असते. अर्जदाराने एक पायरी जादा घेतली आहे. त्यामुळे अर्जदाराला प्रथम निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट चे कामा संदर्भातील मुख्य प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांचेकडे अर्ज देणे बाबत सुचना देणे योग्य हाईल व त्यानंतरचया अर्जाचा विचार व्हावा.

३. अर्जातील कलम १ मधील मजकुर सर्वसाधारणपणे बरोबर आहे.

४. अर्जातील कलम २ मधील मजकुर वि. प यांना मान्य नाही.

५. अर्जातील कलम ३ मधील मजकुराबाबत वि.प. यांना काहीही भाष्य करणेचे नाही.

६. अर्जातील कलम ४ मधील मजकुराबाबत वि.प. यांना काहीही भाष्य करणेचे नाही. या कलमात नमुद कारण अर्जदार यांनी सिध्द करावे.

७. अर्जातील कलम ६ मधील मजकुर वि.प. यांना मान्य नाही.

८. अर्जातील कलम ७ मधील मजकुर व त्यातील विनंत्या वि.प. यांना मान्य नाहीत. सदरची विनंती मान्य करता येणार नाही.

९. अर्जदार व वि.प. यांच्यात प्रलंबित असलेल्या फिर्यादी मधील इशु प्रोसेस ऑर्डरच्या विरूध्द वि. प. यांनी रिव्हिजन अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये झालेले विलंब माफ होणेसाठी किरकोळ अर्ज नं.२२/२०२४, १४१/२०२४ व ९७/२०२३ हे दाखल केले आहेत ते अद्याप प्रलंबित आहेत.

**१०. सबब विनंती की,**

**अ. अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करणेत यावा.**

**येणे प्रमाणे म्हणणे असे.**

For V9 RESOURCES PVT. LTD.

Director

कोल्हापूर

दिनांक. ०२.०७.२०२६

Presented by

Adv. M.M. Shiradwade

वि.प. नं १

For V9 RESOURCES PVT. LTD.

Director

वि.प. नं २

For V9 RESOURCES PVT. LTD.

Director

वि.प. नं ५

**प्रतिज्ञा**

मी मधुसुदन दत्तात्रय सावंत, व.व. ६५, धंदा - व्यापार, रा. ३०१ पर्णकुटी, घटाळी मंदिरा जवळ, घंटाळी, ठाणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर म्हणण्यातील व ॲफिडेव्हीट मध्ये नमूद केलेला सर्व मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कोल्हापूर

दि. १ /०७/२०२६

MSawant